ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

# एम.ए. मराठी (M41)
# एम.ए. हिंदी (M42)
# एम.ए. इंग्रजी (M72) प्रथम वर्ष
# एम.ए. इंग्रजी (M43) द्वितीय वर्ष
# शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

शैक्षणिक वर्ष : 2018–2019

# एम.ए. मराठी (M41), हिंदी (M42), एम.ए. इंग्रजी (M72) प्रथम वर्ष, एम.ए. इंग्रजी (M43) द्वितीय वर्ष शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

## अनुक्रमणिका


१. विद्याशाखेचा परिचय ........ ४

२. शिक्षणक्रमाविषयी ........ ५

३. नोंदणी प्रक्रिया ........ १८

४. विभागीय केंद्रे ........ २१

५. विशेष सूचना/संपर्कासाठी ........ २२

परिशिष्टे ........ २५

Appendix 1 : उमेदवार/विद्यार्थी करारनामा
Candidate/Student Agreement at the time of Admission

Appendix 2 : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली

Appendix 3 : University Grants Commission Resolution (2004)

Appendix 4 : G.R. of Equivalency for 10th and 12th

Appendix 5 : एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश

Appendix 6 : G.R. of Equivalency

Appendix 7 : Letter of Recognition from UGC

Appendix 8 : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*

## निर्मिती

श्री. आनंद यादव, निर्मिती अधिकारी, ग्रंथनिर्मिती केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२१२

© २०१८, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

■ **प्रथम प्रकाशन** : जून २०१८
■ **अक्षरजुळणी** : ॲकोसिस, नाशिक – १०
■ **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

NB-18-19-44 (MA_MAR_HIN_ENG)

# १. विद्याशाखेचा परिचय

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे या विद्याशाखेत मानवनिर्मित कला, साहित्य या सर्जनशील निर्मितिव्यापाराचा आणि कुटुंबसंस्थेपासून राज्यसंस्थेपर्यंतच्या विविध संस्थांच्या रचनांचा, तत्त्वज्ञानाचा व इतिहास–परंपरांचा अभ्यास केला जातो. २१ व्या शतकातील जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बौद्धिक पूर्वतयारी करणे आणि अध्ययनशील समाजासाठी शैक्षणिक संसाधनांचा विकास करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे. विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमांचा आशय हा मानवकेंद्री असतो. मानवी मूल्यांवर व माणसाच्या विकास–कार्यक्रमांवर भर देणारा आशय हे या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांचे वैशिष्ट्य आहे.

विद्याशाखेची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात अशी :

१. जगभरातल्या विविध संस्कृतींचा, राष्ट्र–राज्यांच्या जडणघडणीचा, इतिहास परंपरांचा, बी.ए., एम.ए., एम. फिल. व पीएच.डी. शिक्षणक्रमांचा अभ्यासक्रमात समावेश.

२. मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता, इत्यादी मूल्ये, ग्राहकसंरक्षण, पर्यावरण रक्षणादी चळवळी, सार्क, युनो, इत्यादी जागतिक कल्याणकारी संघटनांचे कार्य, स्त्रियांचे सबलीकरण, वंचितांच्या अस्मितेचे लढे, भाषा, धर्म, प्रदेशांच्या विविधतेतून एकतेसाठी रचलेले नमुना–दर्श, जागतिकीकरण आणि स्थानिक विकासाची सांगड अशा विविध आशयसूत्रांचा अभ्यासक्रमांमध्ये समावेश आहे.

३. ग्रंथालय व माहितीशास्त्र, वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन, गांधीविचारदर्शन, मानवी हक्क, ग्राहक संरक्षण अशा विशेष विषयांवर स्वतंत्र शिक्षणक्रम.

४. सिद्धांत आणि व्यवहार यांची सांगड घालणारे उपयोजित अभ्यासक्रम.

५. व्यक्तीच्या सर्जनशीलतेला व कल्पकतेला वाव देणारे अपारंपरिक अभ्यासक्रम.

६. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि व्यावसायिक यशासाठी लागणाऱ्या पूरक कौशल्यांना वाव देणारे अभ्यासक्रम.

७. स्वयंअध्ययनासाठी लागणाऱ्या नावीन्यपूर्ण कौशल्यांचे शिक्षण.

८. पायाभूत अभ्यासक्रमात विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यावर भर.

९. स्वयंअध्ययन पुस्तके, स्वाध्याय, क्षेत्रीय कार्य, प्रकल्प अभ्यास, उपग्रह सेवा व वेबमाध्यमांतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सेवा अशा विविध अंगांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य.

१०. प्रत्येक शिक्षणक्रमात आवडीप्रमाणे निवड करता येतील असे पर्याय.

# २. शिक्षणक्रमाविषयी

आपल्या विद्यापीठाच्या पदवीधारक विद्यार्थ्यांकडून आणि समाजातील इतर वर्गांकडून पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम सुरू करण्यासाठी सातत्याने मागणी होत होती. त्याचा विचार करून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील दूरशिक्षण केंद्राने विकसित केलेला मराठी, हिंदी व इंग्रजी या विषयातील एम. ए. शिक्षणक्रम सुरू करण्यात आलेला आहे.

## २.१ शिक्षणक्रमाची संरचना

### एम. ए. प्रथम आणि द्वितीय वर्षातील अभ्यासक्रम

एम.ए. मराठी / हिंदी / इंग्रजी हे पदव्युत्तर पदवी पातळीवरील शिक्षणक्रम किमान २ वर्षे कालावधीचे आहेत. एम.ए. इंग्रजी प्रथम वर्ष व द्वितीय वर्षासंदर्भात २.७.१ (पृष्ठ ११) पाहावे. सदर शिक्षणक्रम पूर्ण करण्याचा कमाल कालावधी ५ वर्षांचा असेल. प्रत्येक शिक्षणक्रम ४ सत्रांत विभागलेला आहे. प्रत्येक सत्रांत ४ अभ्यासक्रम आहेत. तर प्रत्येक अभ्यासक्रम ४ श्रेयांकांचा आहे. अशाप्रकारे एकूण ६४ श्रेयांकांचा प्रत्येक पदव्युत्तर पदवी पातळीवरील दोन वर्षांचा शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी ४ सत्रांतील मिळून एकूण १६ अभ्यासक्रमांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावयाचा आहे. प्रत्येक सत्रांत काही अनिवार्य तर काही ऐच्छिक / वैकल्पिक अभ्यासक्रम आहेत. सत्रनिहाय अनिवार्य तसेच ऐच्छिक अभ्यासक्रमांचा तपशील त्या त्या सत्रांच्या पाठ्यक्रमाखाली दर्शविला आहे. ऐच्छिक विषय निवडताना विद्यार्थ्यांनी आपली स्वतःची आवड पाहून अभ्यासक्रम निवडावेत. एकदा निवडलेले अभ्यासक्रम बदलता येणार नाहीत. तसेच पुढील सत्रांत सुद्धा आधीच्या सत्रांतील अभ्यासक्रमाचा पुढचा भाग अभ्यासावयाचा असल्याने, नवीन सत्रात आधी निवडलेल्या ऐच्छिक अभ्यासक्रमाशिवाय वेगळा ऐच्छिक अभ्यासक्रम निवडता येणार नाही. आधीच्या सत्रात निवडलेला ऐच्छिक अभ्यासक्रमच पुढील सत्रांत चालू राहील.

## २.२ कालावधी

दोन वर्षे

## २.३ माध्यम

मराठी, हिंदी, इंग्रजी.

## २.४ श्रेयांक म्हणजे काय?

मुक्त शिक्षण पद्धतीत अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका'च्या परिमाणात केले जाते. याचाच अर्थ अंदाजे ३० ते ३५ अध्ययनतासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. सामान्यतः एका श्रेयांकाचा अभ्यास करण्याकरिता विद्यार्थ्यांस सामान्यतः ३० ते ३५ घड्याळी तास लागतात. या अध्ययन तासांच्या अभ्यासात स्वयं-अध्ययन पुस्तकांचे वाचन करणे, टिपण काढणे, मनन-चिंतन करणे, अभ्यासक्रमासंदर्भातील दृकश्राव्य फिती पाहणे, इंटरनेटवरील मजकूर वाचणे, संपर्कसत्रांतील मार्गदर्शन घेणे, सहअध्यायींशी चर्चा करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, इत्यादी शैक्षणिक प्रयत्नांचा समावेश होतो. एम.ए. मराठी / हिंदी / इंग्रजी पदव्युत्तर पदवी परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांनी एकूण ६४ श्रेयांकांचा अभ्यास पूर्ण करणे अपेक्षित आहे.

## २.५ प्रवेश पात्रता

कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही विद्याशाखेतील पदवी उत्तीर्ण असणारे विद्यार्थी एम. ए. मराठी, हिंदी, इंग्रजी प्रथम वर्षास प्रवेश मिळविण्यासाठी पात्र असतील.

## २.६ शिक्षणक्रम शुल्क (प्रथम वर्ष)

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क | : | रु. २,०००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क | : | रु. २,०००=०० |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु. ४,०००=००** |

## ✣ शिक्षणक्रम शुल्काचा तपशील

| अ.क्र. | शुल्काचे शीर्षक | शुल्क (रु.) |
|---|---|---|
| ०१. | प्रवेश व नोंदणी शुल्क | १००=०० |
| ०२. | शैक्षणिक शुल्क | ८००=०० |
| ०३. | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | ८००=०० |
| ०५. | संकीर्ण | १५०=०० |
| ०६. | विकास निधी | १५०=०० |
| ०७. | अभ्यासकेंद्र शुल्क | २,०००=०० |
| | **एकूण शुल्क (रु.)** | **४,०००=००** |

### शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना

✣ ऑनलाईन प्रवेश करताना विद्यार्थ्यांनी प्रथमतः केवळ विद्यापीठ शुल्क रु. २,०००/- इंटरनेट बँकिंग, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, मोबाईल बँकींग किंवा इतर प्रचलित ऑनलाईन कॅश ट्रान्सफर प्रक्रियेचा वापर करून भरावे. ऑनलाईन फी भरल्याच्या ट्रान्झॅक्शन नंबरची नोंद घेऊन पावती प्रिंट करून घ्यावी आणि प्रवेश अर्जाच्या प्रिंट सोबत जोडून अभ्यासकेंद्रावर जमा करावी.

✣ प्रवेश अर्जाची प्रिंट प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करताना भरलेल्या शिक्षणक्रम शुल्कातील अभ्यासकेंद्राचे शुल्क रु. २,०००/- मात्र अभ्यासकेंद्राच्या बँक खात्यात बँक चलनाने भरून अथवा क्रॉस केलेला अकाऊंट पेयी चेक अदा करून किंवा अभ्यासकेंद्राने निर्धारित केलेल्या अधिकृत पद्धतीने जमा करून पावती घ्यावी व ती शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत स्वतंत्र फाईलमध्ये जतन करून ठेवावी.

✣ अशा पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतिक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

## २.७ एम.ए. मराठी/हिंदी/इंग्रजी शिक्षणक्रमाची रचना (प्रथम वर्ष)

### ✣ एम.ए. मराठी : सत्र पहिले

| क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रम संकेतांक | अनिवार्य/ ऐच्छिक |
|---|---|---|---|
| | **गट-१ : अनिवार्य अभ्यासक्रम** | | |
| १. | साहित्यविचार व समिक्षा | MAR 521 | अनिवार्य |
| २. | मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स. १८०० ते १९८०) (प्रारंभ ते कादंबरी) | MAR 521 | अनिवार्य |
| | **गट-२ : ऐच्छिक अभ्यासक्रम (किमान १ अभ्यासक्रम निवडावा, जो पुढील सत्रात देखील कायम ठेवणे अनिवार्य असेल.)** | | |
| ३. | एका लेखकाचा अभ्यास मध्ययुगीन : तुकाराम (काव्य) | MAR 523 | ऐच्छिक |
| | एका लेखकाचा अभ्यास अर्वाचीन : भालचंद्र नेमाडे (समकाल ते बिदार) | MAR 524 | ऐच्छिक |
| | **गट-३ : ऐच्छिक अभ्यासक्रम (किमान १ अभ्यासक्रम निवडावा, जो पुढील सत्रात देखील कायम ठेवणे अनिवार्य असेल.)** | | |
| ४. | मराठी भाषा : संप्रेषण आणि सर्जन | MAR 525 | ऐच्छिक |
| | मराठी वाङ्मयीन चळवळींचा अभ्यास | MAR 526 | ऐच्छिक |
| | लोकसाहित्य आणि मराठी (लोकसाहित्य व परंपरा) | MAR 527 | ऐच्छिक |

## ✣ एम.ए. मराठी : सत्र दुसरे

| क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रम संकेतांक | अनिवार्य/ ऐच्छिक |
|---|---|---|---|
| | **गट-१ : अनिवार्य अभ्यासक्रम** | | |
| १. | समिक्षा व सौंदर्यशास्त्र | MAR 541 | अनिवार्य |
| २. | मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स. १८०० ते १९८०) (नाट्यवाङ्मय ते ललितेतर) | MAR 542 | अनिवार्य |
| | **गट-२ : ऐच्छिक अभ्यासक्रम (किमान १ अभ्यासक्रम निवडावा)** | | |
| ३. | एका लेखकाचा अभ्यास<br>मध्ययुगीन : तुकाराम (तत्त्वज्ञान) | MAR 543 | ऐच्छिक |
| | एका लेखकाचा अभ्यास<br>अर्वाचीन : भालचंद्र नेमाडे (जरीला ते समिक्षा) | MAR 544 | ऐच्छिक |
| | **गट-३ : ऐच्छिक अभ्यासक्रम (किमान १ अभ्यासक्रम निवडावा)** | | |
| ४. | मराठी भाषा : लेखन आणि उपयोजन | MAR 545 | ऐच्छिक |
| | मराठी वाङ्मयीन चळवळींचा अभ्यास (स्त्रीवादी ते आदिवासी) | MAR 546 | ऐच्छिक |
| | लोकसाहित्य आणि मराठी लोकसाहित्य (परंपरा व संशोधन) | MAR 547 | ऐच्छिक |
| | **गट-४ : ऑडिट कोर्स (किमान १ अभ्यासक्रम निवडावा)** | | |
| ५. | संवाद कौशल्ये | OPN 101 | ऐच्छिक |
| | वृत्तपत्र व जनसंज्ञापन | MCJ 205 | ऐच्छिक |

## ✣ एम.ए. हिंदी (प्रथम वर्ष) : सत्र पहला

| *क्र.* | *पाठ्यक्रम का नाम* | *पाठ्यक्रम संकेतांक* | *अनिवार्य/ वैकल्पिक* |
|---|---|---|---|
| | **गुट-१ : अनिवार्य पाठ्यक्रम** | | |
| १. | आधुनिक गद्य साहित्य - १ | HIN 521 | अनिवार्य |
| २. | भाषा विज्ञान एवं हिंदी भाषा - १ | HIN 522 | अनिवार्य |
| ३. | प्रयोजनमुलक हिंदी - १ | HIN 523 | अनिवार्य |
| | **गुट-२ : वैकल्पिक पाठ्यक्रम (कोई १ पाठ्यक्रम चुने जो अगले सत्र में भी जारी रहेगा)** | | |
| ४. | व्यावसायिक वर्ग-पत्रकारिता प्रशिक्षण-१ | HIN 524 | वैकल्पिक |
| | साहित्य वर्ग-विशेष रचनाकार : मोहनदास नेमिशराम-१ | HIN 526 | वैकल्पिक |
| | साहित्य वर्ग-प्राचीन एवं निर्गुण भक्ती काव्य-१ | HIN 527 | वैकल्पिक |

## ✣ एम.ए. हिंदी (प्रथम वर्ष) : सत्र दुसरा

| *क्र.* | *पाठ्यक्रम का नाम* | *पाठ्यक्रम संकेतांक* | *अनिवार्य/ वैकल्पिक* |
|---|---|---|---|
| | **गुट-१ : अनिवार्य पाठ्यक्रम** | | |
| १. | आधुनिक गद्य साहित्य - २ | HIN 541 | अनिवार्य |
| २. | भाषा विज्ञान एवं हिंदी भाषा - २ | HIN 542 | अनिवार्य |
| ३. | प्रयोजनमुलक हिंदी - २ | HIN 543 | अनिवार्य |
| | **गुट-२ : वैकल्पिक पाठ्यक्रम (कोई १ पाठ्यक्रम चुने जो अगले सत्र में भी जारी रहेगा)** | | |
| ४. | व्यावसायिक वर्ग-पत्रकारिता प्रशिक्षण-२ | HIN 544 | वैकल्पिक |
| | व्यावसायिक वर्ग-भाषा प्रोद्योगिकी -२ | HIN 545 | वैकल्पिक |
| | साहित्य वर्ग-विशेष रचनाकार : मोहनदास नेमिशराम-२ | HIN 546 | वैकल्पिक |
| | साहित्य वर्ग-प्राचीन एवं निर्गुण भक्ती काव्य-२ | HIN 547 | वैकल्पिक |
| | **गुट-३ : ऑडिट कोर्स (कोई १ पाठ्यक्रम चुने)** | | |
| ५. | हिंदी अनुवाद : स्वरूप एवं विवेचन | HIN 307 | वैकल्पिक |
| ६. | संवाद कौशल | OPN 102 | वैकल्पिक |

## २.७.१ नव्याने स्वीकृत एम.ए. इंग्रजी (M72)

### पार्श्वभूमी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा (इग्नू) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेसोबत शिक्षणक्रम आणि अध्ययन साहित्याची देवाणघेवाण करण्याच्या संदर्भातील सामंजस्य करार झालेला आहे. त्यानुसार आपल्या विद्यापीठाने इग्नूकडून एम.ए. इंग्रजी (M72) हा शिक्षणक्रम स्वीकारला आहे. सन २०१८–१९ शैक्षणिक वर्षापासून यापूर्वीच्या एम.ए. इंग्रजी (M43) या शिक्षणक्रमाऐवजी नव्याने इग्नूद्वारे स्वीकृत एम.ए. इंग्रजी (M72) ह्या शिक्षणक्रमाचे प्रथम वर्ष सुरू करण्यात येत आहे. त्यानुसार २०१८–१९ मध्ये एम.ए. इंग्रजी करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी नवीन एम.ए. इंग्रजी (M72) या शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेश घ्यावयाचा आहे. मात्र २०१७–१८ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्ष पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी २०१८–१९ मध्ये त्यांच्या यापूर्वीच्याच म्हणजे एम.ए. इंग्रजी (M43) या शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्षास प्रवेश घ्यावयाचा आहे.

### शिक्षणक्रम संरचना

२०१८–१९ शैक्षणिक वर्षापासून नव्याने दिल्या जाणारा एम.ए. इंग्रजी (M72) शिक्षणक्रम ६४ श्रेयांकाचा असेल. ह्या शिक्षणक्रमास सत्र पद्धती असणार नाही. प्रथम वर्षाअखेर अंतिम परीक्षा होईल. यात प्रथम वर्षात प्रत्येकी ८ श्रेयांकाचा एक याप्रमाणे एकूण ३२ श्रेयांकांचे चार अभ्यासक्रम असतील. सर्व अभ्यासक्रम अनिवार्य असतील. अंतिम परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन आणि उत्तीर्णतेचे नियम पूर्वीप्रमाणेच असतील. यासंबंधी अधिक माहिती यापुढे दिलेली आहे.

कृपया प्रथम वर्ष शिक्षणक्रमाची रचना पुढील पानावर पाहा.

## ✣ M.A. English (M72) : First Year

| *No.* | *Title of the Course* | *Course Code* | *Compulsory / Optional* | *Credit Points* |
|---|---|---|---|---|
| | **GROUP - I** | | | |
| 1. | British Poetry | ENG401 | Compulsory | 8 |
| 2. | British Drama | ENG402 | Compulsory | 8 |
| 3. | British Novel | ENG403 | Compulsory | 8 |
| 4. | Aspects of Language | ENG404 | Compulsory | 8 |
| | **AUDIT COURSES** *(Select any ONE Course)* | | | |
| 5. | Communication Skills | ENG547 | Optional | NA |
| 5. | Journalism & Mass Communication | ENG548 | Optional | NA |

## २.८ शिक्षणक्रम शुल्क (द्वितीय वर्ष)

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क | : | रु. २,०००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क | : | रु. २,०००=०० |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु. ४,०००=००** |

### ✣ शिक्षणक्रम शुल्काचा तपशील

| *अ.क्र.* | *शुल्काचे शीर्षक* | *शुल्क (रु.)* |
|---|---|---|
| ०१. | प्रवेश व नोंदणी शुल्क | १००=०० |
| ०२. | शैक्षणिक शुल्क | ८००=०० |
| ०३. | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | ८००=०० |
| ०५. | संकीर्ण | १५०=०० |
| ०६. | विकास निधी | १५०=०० |
| ०७. | अभ्यासकेंद्र शुल्क | २,०००=०० |
| | **एकूण शुल्क (रु.)** | **४,०००=००** |

**सूचना :** ऑनलाईन प्रवेश करताना विद्यार्थ्यांनी प्रथमतः केवळ विद्यापीठ शुल्क रु. २,०००/- इंटरनेट बँकिंग, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, मोबाईल बँकींग किंवा इतर प्रचलित ऑनलाईन कॅश ट्रान्सफर प्रक्रियेचा वापर करून भरावे. ऑनलाईन फी भरल्याच्या ट्रान्झॅक्शन नंबरची नोंद घेऊन पावती प्रिंट करून घ्यावी आणि प्रवेश अर्जाच्या प्रिंट सोबत जोडून अभ्यासकेंद्रावर जमा करावी.

प्रवेश अर्जाची प्रिंट प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करताना भरलेल्या शिक्षणक्रम शुल्कातील अभ्यासकेंद्राचे शुल्क रु. २,०००/- मात्र अभ्यासकेंद्राच्या बँक खात्यात बँक चलनाने भरून अथवा क्रॉस केलेला अकाऊंट पेयी चेक अदा करून किंवा अभ्यासकेंद्राने निर्धारित केलेल्या अधिकृत पद्धतीने जमा करून पावती घ्यावी व ती शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत स्वतंत्र फाईलमध्ये जतन करून ठेवावी.

अशा पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतिक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

## २.९ एम.ए. मराठी/हिंदी/इंग्रजी शिक्षणक्रमाची रचना (द्वितीय वर्ष)

### ✣ एम.ए. मराठी : सत्र तिसरे

| क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रम संकेतांक | अनिवार्य/ ऐच्छिक |
|---|---|---|---|
| | **गट-१ : अनिवार्य अभ्यासक्रम** | | |
| १. | आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा-१ | MAR 551 | अनिवार्य |
| २. | एका वाङ्मय प्रकाराचा अभ्यास : कादंबरी-१ | MAR 552 | अनिवार्य |
| ३. | मध्ययुगीन मराठी वाङ्मय : गद्य आणि पद्य-१ | MAR 553 | अनिवार्य |
| | **गट-२ : ऐच्छिक अभ्यासक्रम (किमान १ अभ्यासक्रम निवडावा)** | | |
| ४. | मराठी भाषा : उपयोजन आणि सर्जन-१ | MAR 554 | ऐच्छिक |
| | वैचारिक वाङ्मय-१ | MAR 555 | ऐच्छिक |
| | लोकप्रिय साहित्य आणि विज्ञान साहित्य-१ | MAR 556 | ऐच्छिक |

### ✣ एम.ए. मराठी : सत्र चौथे

| क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रम संकेतांक | अनिवार्य/ ऐच्छिक |
|---|---|---|---|
| | **गट-१ : अनिवार्य अभ्यासक्रम** | | |
| १. | आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा-२ | MAR 561 | अनिवार्य |
| २. | एका वाङ्मय प्रकाराचा अभ्यास : कादंबरी-२ | MAR 562 | अनिवार्य |
| ३. | मध्ययुगीन मराठी वाङ्मय : गद्य आणि पद्य-२ | MAR 563 | अनिवार्य |
| | **गट-२ : ऐच्छिक अभ्यासक्रम (किमान १ अभ्यासक्रम निवडावा)** | | |
| ४. | वैचारिक वाङ्मय-२ | MAR 565 | ऐच्छिक |
| | लोकप्रिय साहित्य आणि विज्ञान साहित्य-२ | MAR 566 | ऐच्छिक |

## ✣ एम.ए. हिंदी : सत्र तिसरा

| क्र. | पाठ्यक्रम का नाम | पाठ्यक्रम संकेतांक | अनिवार्य/ वैकल्पिक |
|---|---|---|---|
| | **गुट-१ : अनिवार्य पाठ्यक्रम** | | |
| १. | आधुनिक हिंदी काव्य – १ | HIN 551 | अनिवार्य |
| २. | काव्यशास्त्र एवं साहित्यलोचन – १ | HIN 552 | अनिवार्य |
| ३. | हिंदी साहित्य का इतिहास – १ | HIN 553 | अनिवार्य |
| | **गुट-२ : वैकल्पिक पाठ्यक्रम (कोई १ पाठ्यक्रम चुने)** | | |
| ४. | व्यावसायिक वर्ग : अनुवाद, सिद्धांत और प्रयोग-१ | HIN 554 | वैकल्पिक |
| | साहित्य वर्ग : विशेष विद्या का अध्ययन हिंदी उपन्यास – १ | HIN 555 | वैकल्पिक |

## ✣ एम.ए. हिंदी : सत्र चौथा

| क्र. | पाठ्यक्रम का नाम | पाठ्यक्रम संकेतांक | अनिवार्य/ वैकल्पिक |
|---|---|---|---|
| | **गुट-१ : अनिवार्य पाठ्यक्रम** | | |
| १. | आधुनिक हिंदी काव्य – २ | HIN 561 | अनिवार्य |
| २. | काव्यशास्त्र एवं साहित्यलोचन – २ | HIN 562 | अनिवार्य |
| ३. | हिंदी साहित्य का इतिहास – २ | HIN 563 | अनिवार्य |
| | **गुट-२ : वैकल्पिक पाठ्यक्रम (कोई १ पाठ्यक्रम चुने)** | | |
| ४. | व्यावसायिक वर्ग : अनुवाद, सिद्धांत और प्रयोग-२ | HIN 564 | वैकल्पिक |
| | साहित्य वर्ग : विशेष विद्या का अध्ययन हिंदी उपन्यास – २ | HIN 565 | वैकल्पिक |

## एम.ए. इंग्रजी (वर्ष दुसरे)

### ✣ M.A. English : Third Semester

| No. | Title of the Course | Course Code | Compulsory / Optional |
|---|---|---|---|
| | **GROUP - I : COMPULSORY** | | |
| 1. | Literature in English : Drama - I | ENG 551 | Compulsory |
| 2. | Critical Theories - I | ENG 552 | Compulsory |
| 3. | Modern & Postmodern British Literature-I | ENG 553 | Compulsory |
| | **GROUP - II : OPTIONAL** *(Select any ONE Course. Same course will have to be continued in next Semester)* | | |
| 4. | Indian English Poetry - I | ENG 554 | Optional |
| | 20th Century American Literature - I | ENG 555 | Optional |
| | British Literature from Pope to the End of the 19th Century - I | ENG 556 | Optional |

### ✣ M.A. English : Fourth Semester

| No. | Title of the Course | Course Code | Compulsory / Optional |
|---|---|---|---|
| | **GROUP - I : COMPULSORY** | | |
| 1. | Literature in English : Drama - II | ENG 561 | Compulsory |
| 2. | Critical Theories - II | ENG 562 | Compulsory |
| 3. | Modern & Postmodern British Literature-II | ENG 563 | Compulsory |
| | **GROUP - II : OPTIONAL** | | |
| 4. | Indian English Poetry - II | ENG 564 | Optional |
| | 20th Century American Literature - II | ENG 565 | Optional |
| | British Literature from Pope to the End of the 19th Century - II | ENG 566 | Optional |

## २.१० मूल्यमापन प्रक्रिया

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे अंतर्गत मूल्यमापन आणि अंतिम परीक्षा अशा दोन पातळ्यांवर केले जाते. प्रती अभ्यासक्रंम ८०:२० अशा गुणोत्तरानुसार गुणदानाचे स्वरूप असेल.

### ✣ अंतर्गत मूल्यमापन

अंतर्गत मूल्यमापनात प्रत्येक सत्रातील प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता २० गुणांचा गृहपाठ देण्यात येईल. त्यात प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न देण्यात येतील. गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या मूल्यमापन व परीक्षा विभागामार्फत विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. विद्यार्थ्यांनी गृहपाठाचे प्रश्न अभ्यासकेंद्राच्या साहाय्याने अथवा स्वतः डाऊनलोड करून घ्यावेत. गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावर कधी अपलोड केले जातील यासंदर्भात आपण अभ्यासकेंद्राच्या सतत संपर्कात राहणे तसेच वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळास स्वतःसुद्धा भेट देऊन गृहपाठाचे प्रश्न डाऊनलोड करून घेणे अपेक्षित आहे. तसेच गृहपाठाच्या प्रश्नांची उत्तरे स्वच्छ हस्ताक्षरात लिहून अभ्यासकेंद्रांनी अंतिम परीक्षा सुरू होण्यापूर्वीच्या दिलेल्या मुदतीत अभ्यासकेंद्रावर जमा करणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे अभ्यासकेंद्रांनी विद्यार्थ्यांचे गृहपाठ संबंधित समंत्रकांकरवी लवकरात लवकर तपासून त्यावर योग्य त्या सूचना, शेरे तसेच प्रत्याभरण (फीडबॅक) ची नोंद करून तसेच २० पैकी गुणदान करून विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेपूर्वी परत करणे अनिवार्य आहे. अभ्यासकेंद्रांनी विद्यार्थ्यांच्या गृहपाठांना दिलेल्या गुणांची एकत्रित यादी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दिलेल्या विहित नमुन्यात आणि मुदतीत (अंतिम परीक्षेपूर्वी) परीक्षा विभागास पाठविणे अनिवार्य आहे.

विद्यार्थी गृहपाठास प्रत्येक अभ्यासक्रमात २०% गुणांचा भारांक (weightage) असेल. तसेच प्रत्येक अभ्यासक्रमाची अंतिम परीक्षा ८०% गुणांच्या भारांकाची असेल. प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतर्गत मूल्यमापनात किमान ४०% गुण मिळविणे आवश्यक असेल. अंतर्गत मूल्यमापन म्हणजेच गृहपाठ पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापनात मिळालेले गुण अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांत मिसळले जातील. गृहपाठ पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना अंतिम परीक्षेची तयारी करण्याच्या दृष्टीने सराव होईल तसेच प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्यासाठीही लाभ होईल.

## ✣ अंतिम परीक्षा

प्रत्येक सत्रात प्रती अभ्यासक्रम ८० गुणांची अंतिम परीक्षा असेल. प्रत्येक अभ्यासक्रमास ८० गुणांची एक याप्रमाणे प्रती सत्र चार अभ्यासक्रमांकरिता ८० गुणांच्या ४ प्रश्नपत्रिका असतील. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे ४ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणांचे ५ उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नातील पाचपैकी चार उप-प्रश्न सोडवावयाचे असतील. विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (UA) दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल.

प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गृहपाठासाठी प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न सोडवावयाचे असतील. अंतर्गत मूल्यमापनासाठीचे (गृहपाठाचे) प्रश्न विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरूनव डाऊनलोड करून घ्यायचे आहेत. अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल. अंतर्गत मूल्यमापनाअंतर्गत २० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (CA) दर्शविण्यात येतील. तसेच हे गुण अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांत मिसळून गुणपत्रिकेत एकत्रितपणे दर्शविण्यात येतील.

**महत्त्वाची सूचना**

**प्रत्येक अभ्यासक्रमात स्वतंत्रपणे उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.**

## ✣ ऑडिट कोर्स

विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी)च्या सूचनेनुसार एम.ए. मराठी, हिंदी आणि इंग्रजी शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना व्यावहारिक कौशल्ये प्राप्त करता यावीत म्हणून कौशल्याधारित दोन ऑडिट कोर्स देण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी त्यापैकी एक ऑडिट कोर्स निवडून तो पूर्ण करणे अनिवार्य आहे. या ऑडिट कोर्सचे अध्ययन साहित्य विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून उपलब्ध (डाऊनलोड) करून घ्यावे.

विद्यार्थ्यांनी निवडलेल्या ऑडिट कोर्सची ८० गुणांची सत्र परीक्षा होईल. यात ५ गुणांचे २० प्रश्न देण्यात येतील. त्यापैकी कोणतेही १६ प्रश्न सोडविणे आवश्यक असेल. याशिवाय २० गुणांचा गृहपाठ पूर्ण करणे सुद्धा अनिवार्य असेल. या गृहपाठासाठी ५ गुणांचे ४ प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांनी ते डाऊनलोड करून घ्यावेत आणि गृहपाठ पूर्ण करून अभ्यासकेंद्रावर जमा करावेत.

ऑडिट कोर्सच्या सत्र परीक्षेच्या मूल्यमापनावर आधारित 'श्रेणी' देण्यात येईल. यात किमान 'सी' श्रेणी प्राप्त करणे अनिवार्य असेल. हा ऑडिट कोर्स पूर्ण केल्याची नोंद आणि त्यात मिळालेली श्रेणी गुणपत्रकात स्वतंत्रपणे दर्शविण्यात येईल. मात्र ऑडिट कोर्समधील श्रेणी सत्र परीक्षेच्या निकालाच्या श्रेणीसाठी किंवा एम.ए. शिक्षणक्रमाच्या एकूण श्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

## ३. नोंदणी प्रक्रिया

विद्यापीठाच्या सर्वच शिक्षणक्रमांची प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येते. खालील सूचनांचे आपण काटेकोरपणे पालन करावे.

(१) माहितीपुस्तिकेचा बारकाईने अभ्यास करावा. आपण शिक्षणक्रमाच्या प्रवेशास पात्र आहात याची खात्री आणि आपण पात्र असल्याचा पुरावा म्हणून खालील दस्तऐवजांची स्कॅन प्रत मिळवावी.

- (अ) जन्मतारखेचा दाखला (वाहन परवाना किंवा पॅनकार्ड किंवा जन्मतारीख असलेले आधारकार्ड किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा पासपोर्ट किंवा इलेक्शन कार्ड).
- (आ) पात्रतेच्या परीक्षेचे गुणदानपत्र किंवा प्रमाणपत्र.
- (इ) जर पात्रतेसाठी प्रवेश परीक्षा आवश्यक असेल तर सदरची प्रवेश परीक्षा पात्र झाल्याचे प्रमाणपत्र.
- (ई) जर आपण मागासवर्गीय उमेदवार असाल तर आपल्या संवर्गासंदर्भातील नियमाप्रमाणे जातीचा दाखला, जात पडताळणी, नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट, इत्यादी.
- (उ) जर आपण अपंगत्व असलेले (उदा. अंधत्व असलेले विद्यार्थी असाल तर आपले अपंगत्व दर्शविणारी कागदपत्रे).

(२) आपणास किमान ७२ डीपीआय या रिझॉल्युशन बरहुकूम वरील सर्व दस्तऐवजांची स्कॅनिंग करणे आवश्यक आहे. यासाठी आपण आपल्या मित्रांची किंवा अभ्यासकेंद्राची मदत घेऊ शकता.

(३) आपणाकडे चालू स्थितीत असलेला भ्रमणध्वनी क्रमांक आणि वैध इ-मेल आयडी असणे गरजेचे आहे. इ-मेल आयडी मिळविण्यासाठी आपण gmail.com, outlook.com rediffmail.com किंवा yahoo.com. यासारख्या

संकेतस्थळांवर भेट देऊन विनाशुल्क इ-मेल आयडी मिळवू शकतात. यांचा वापर आपणांस पासवर्ड, प्रवेशाची स्थिती, इत्यादी माहिती मिळविण्यासाठी केला जातो.

(४) आपणास विद्यापीठाचे शुल्क भरण्यासाठी डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्ड किंवा इंटरनेट बँकिंग किंवा मोबाईल मनी आयडेंटिफायर (MMID) यांचा वापर करता येईल किंवा भारतीय स्टेट बँक यांच्या शाखांमध्ये किंवा विद्यापीठाने ठरवून दिलेल्या इतर राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखांमध्ये रोख स्वरूपात शुल्क भरता येईल. यासाठी आपण कोणत्या मार्गाने भरणा करता त्यानुसार बँकांचे सेवाशुल्क भरावे लागेल. सदरचे बँकेचे शुल्क हे विद्यापीठ शुल्काच्या व्यतिरिक्त असेल. आपण आपल्या स्वतःच्या बँक खात्यामधूनच इलेक्ट्रॉनिक पद्धतीने शुल्काचा भरणा करावा असा आमचा सल्ला आहे कारण जर आपले शुल्क (विद्यापीठ आपली जबाबदारी काही तांत्रिक अडचणींमुळे पूर्ण करू शकत नसल्यास) परत करावे लागल्यास सदरचे शुल्क आपण ज्या खात्यातून विद्यापीठास शुल्क भरणा केली होती त्याच खात्यात शुल्काची परतफेड केली जाते. आपल्या स्वतःचे खाते असल्यास आपणास या सुविधेचा वापर करता येईल.

(५) स्वतःचे बचत खाते नसल्यास आपण शून्य बॅलन्स असलेले डेबिट कार्ड किंवा नेट बँकिंग फॅसिलिटी असलेले बचत खाते उघडू शकता. या खात्यांमध्ये किमान शिल्लक ठेवणे अनिवार्य नसते.

(६) नोंदणी प्रक्रियेसाठी इंटरनेट जोडणी असलेली संगणकाची सेवा घ्यावी लागते. जर तुमच्याकडे अशा प्रकारचे संगणक नसतील तर आपण सायबर कॅफे किंवा अभ्यासकेंद्रे किंवा मित्राकडील उपलब्ध संगणकाचा वापर करू शकता.

(७) आपण वर नमूद केल्याप्रमाणे पूर्वतयारी केल्यानंतर ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेकडे वळू शकता. यासाठी आपण विद्यापीठाचे संकेतस्थळ http://ycmou.digitaluniversity.ac येथे क्लिक करा.

(८) जर तुमच्याकडे १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक असेल तर आपणास या आशयाच्या हायपर लिंकवर क्लिक करावे लागेल. कृपया 'शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या ऑनलाइन प्रवेशासाठी १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नसलेल्या अर्जदारांनी येथे क्लिक करा' येथे क्लिक करू नका. जरी आपणास

एखाद्या शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश घ्यावयाचा असेल आणि आपणाकडे अगोदरच १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक असेल तरीही 'शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या ऑनलाइन प्रवेशासाठी १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नसलेल्या अर्जदारांनी येथे क्लिक करा' येथे क्लिक करू नका.

(९) तसेच जर तुमच्याकडे १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नसेल तर होम पेजवरील त्या आशयाच्या हायपर लिंकवर क्लिक करावे. चुकीचा पर्याय निवडू नये. संकेतस्थळावरील सूचनेप्रमाणे आपणास इ-मेल आयडी, मोबाईल क्रमांक, इत्यादी माहिती भरून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवावा लागेल.

(१०) ऑनलाइन पद्धतीने प्रवेश कसे मिळवावे यासंदर्भातील स्क्रिन शॉट असलेली एक पुस्तिका संकेतस्थळावर आणि या माहितीपुस्तिकेत उपलब्ध करून दिलेली आहे. याचा वापर केल्यास आपणास ऑनलाइन अर्ज भरणे सोयीचे जाईल.

(११) आपण सर्व तपशील ऑनलाइन पद्धतीने सादर केल्यानंतर संगणकीय प्रणाली आपणांस स्कॅन केलेली कागदपत्रे सादर करण्यास (अपलोड करण्यास) सूचना करेल. आपण सादर केलेल्या माहितीप्रमाणे आपणांस कोणकोणती कागदपत्रे सादर करावयाची आहेत याचा स्वयंचलित पद्धतीने अभ्यास करून संगणकीय प्रणाली सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील ठरविते.

(१२) सर्व कागदपत्रे अपलोड केल्यानंतर आपण इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंग किंवा मोबाईल बँकिंग) विद्यापीठ शुल्काचा भरणा कराल. ऑनलाइन पेमेंट गेटवे वापरून भरणा कसा करावयाचा याबाबत एक पुस्तिका विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(१३) रोखीने शुल्क अदा करावयाचे असल्यास आपणास इ-चलन प्रिंट करून घ्यावे लागेल. आपण सादर केलेल्या तपशिलाप्रमाणे सदरचे इलेक्ट्रॉनिक चलन संगणकीय प्रणाली तयार करते. सदरच्या चलनाच्या प्रिंटच्या दिनांकापासून दोन कार्यदिवस झाल्यानंतर भारतीय स्टेट बँक किंवा विद्यापीठाने ठरवून दिलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांच्या आपण निवडलेल्या शाखांमध्ये आपण रोख स्वरूपात भरणा करू शकता. भरणा झाल्यानंतर बँकेच्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी, मुद्रा (सील), ट्रँन्झॅक्शन नंबर, सुवाच्य अक्षरात लिहिलेले आहे याची खात्री करावी.

(१४) आपणास ट्रॅन्झॅक्शन नंबर आपल्या विद्यापीठाच्या युजर आयडीवर लॉग इन करून सादर करता येईल.

(१५) आपण सादर केलेल्या कागदपत्रांची विद्यापीठ स्तरावरील छाननी झाल्यानंतर आपला प्रवेश निश्चित केला जाईल याची नोंद घ्यावी.

(१६) ऑनलाइन प्रवेश नोंदणी प्रक्रियेसाठी परिशिष्ट क्र. १ पहावे.

## ४. विभागीय केंद्रे

**(१) अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र,
व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही.
अमरावती – ४४४ ६०४
✆ : (०७२१) २५३१४४५ फॅक्स : २५३१४४४

**(२) औरंगाबाद :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र
सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस
नंदनवन कॉलनी, छावणी,
औरंगाबाद – ४३१ ००२
✆ : (०२४०) २३७१०७७ / २३७१०६६
फॅक्स : (०२४०) २३७१०८८

**(३) मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र
द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा,
दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक
ग्रँट रोड (प.) मुंबई – ४०० ००७
✆ : (०२२) २३८७४१८६,२३८७४१७७, २३८२६१३५
फॅक्स : २३८१३२५६

**(४) नागपूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र
रावबहादूर डी., लक्ष्मीनारायण बंगला, विद्यापीठ क्रीडा परिसर
लॉ कॉलेज कॅम्पस, रविनगर चौक
नागपूर – ४४० ००१
✆ : (०७१२) २५५३७२४ फॅक्स : २५५३७२५

(५) **नाशिक** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र,
नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत
दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी
नाशिक –४२२ ००२
✆ : (०२५३) २३१७०६३
फॅक्स : २५७६७५६

(६) **पुणे** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा
क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ हौदासमोर, कुमठेकर मार्ग
पुणे –४११ ०३०
✆ : (०२०) २४४५७९१४
फॅक्स : २४४९११०७

(७) **कोल्हापूर** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ, विद्यानगर
कोल्हापूर – ४१६ ००४
✆ : (०२३१) २६०७०२२ फॅक्स : २६०७०२३

(८) **नांदेड** : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत
नांदेड – ४२१ ६०६
✆ : (०२४६२) २८३०३८, २२९९४० फॅक्स : २२९९५०

# ५. विशेष सूचना / संपर्कासाठी

## (अ) प्रवेश–अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना

१. प्रवेश–अर्ज भरण्यापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहितीपुस्तिका वाचावी.

२. प्रवेश–अर्जातील सर्व माहिती पूर्ण भरावी.

३. विद्यापीठाकडून मिळालेले ओळखपत्र हरविल्यास रु. १५ आणि गुणपत्रक हरविल्यास रु. ५० (एकत्रित गुणपत्रक रु. १००/–) भरून दुसरी प्रत

मिळेल. त्यासाठी शुल्काबरोबर आपले नाव, नोंदणी क्रमांक, वर्ग व अभ्यासकेंद्र नाव आणि संकेतांक ही माहिती कळविणे आवश्यक आहे. ही रक्कम डी.डी.ने पाठवावी. गुणपत्रकासाठी रु. ५०/- अथवा रु. १००/- च्या बॉण्ड पेपरवर प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक आहे.

## (आ) अभ्यासकेंद्रासंबंधीच्या सूचना

१. प्रवेशाची मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. ओळखपत्रावर अभ्यासकेंद्र प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा.

२. अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे.

३. विद्यापीठाने केलेल्या नियोजनाप्रमाणे अंतिम परीक्षा परीक्षाकेंद्रावर घेण्यात येतात, त्यात बदल केला जात नाही.

४. अभ्यासकेंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल.

५. **प्रथम वर्षाला ज्या नावाने प्रवेश घेतलेला आहे, त्याच नावाने पदव्युत्तर प्रमाणपत्र मिळेल. त्यात बदल होणार नाही.**

## (इ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक ४२२ २२२.
दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७.

### विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत –

- सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५
  (दुपारी १.३० ते २ सुटी)
- रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार आणि शासकीय सुटीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

## ■ विशेष अडचणींबाबत संपर्क

१. **माहितीपुस्तिका, प्रवेश–अर्ज, अभ्यासकेंद्र अडचणी :**
विभागीय संचालक, विभागीय केंद्र

२. **अभ्यासक्रम (विषय) यांतील अडचणी :**
संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
दूरध्वनी – (०२५३) २२३१४७५

३. **नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, केंद्रबदल :**
संचालक, विद्यार्थी सेवा विभाग
दूरध्वनी – (०२५३)

४. **परीक्षा, परीक्षा–अर्ज, परीक्षा क्रमांक , निकाल, पदवी प्रमाणपत्र, इत्यादी**
परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग
दूरध्वनी – (०२५३) २२३०७१६
मोबाईल – ०९४२२२४७२९०

५. **अध्ययन–साहित्य, पुस्तके, कार्यपुस्तिका, इत्यादी :**
भांडार व्यवस्थापक, भांडार व जावक कक्ष
दूरध्वनी – (०२५३) २२३०१०७

# परिशिष्टे / Appendices

## परिशिष्ट १ : उमेदवार / विद्यार्थी करारनामा

हा करार विद्यार्थी किंवा उमेदवार आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यचममुवि) यांच्यामध्ये, विद्यार्थी / उमेदवार याने 'Accept' ह्या बटनावर क्लिक केल्यामुळे आपोआप अस्तित्वात आलेला आणि दोन्ही पक्षांना मान्य, कबूल आणि वैध असलेला मानण्यात येईल.

या करारनाम्यात 'उमेदवार' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आला आहे की जो यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमात प्रवेश घेऊ इच्छितो आणि 'विद्यार्थी ' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आलेला आहे, ज्या व्यक्तीने यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमास विहित पद्धतीचा अवलंब करून प्रवेश घेतला आहे.

उमेदवार असे मान्य व कबूल करितो की,

१) त्याने माहितीपुस्तिका तसेच संगणक पडद्यावर उपलब्ध असलेल्या मजकुराचा, माहितीचा, सूचनांचा व्यवस्थित पद्धतीने अभ्यास केला आहे आणि त्यानुसार योग्य त्या कृती केल्या आहेत.

